| Article Date | Headline / Summary | Publication |
|---|---|---|
| 05 Oct 2026 | Health insurance coverage for pets too | Maharashtra Times (Marathi) |

(चित्र : एआय)



# पाळीव प्राण्यांसाठीही आरोग्य विम्याचे कवच

**पाळीव प्राणी आता केवळ घराची शोभा राहिलेले नसून, ते कुटुंबातील भावनिक आधार बनले आहेत. त्यांच्या उपचारांचा वाढता खर्च पाहता, आरोग्य विम्यात त्यांच्यासाठीही आर्थिक संरक्षण महत्त्वाचे ठरते. माणसांसोबत श्वान आणि मांजरींनाही संरक्षण देणाऱ्या विमा पॉलिसी आधुनिक कुटुंबांच्या बदलत्या गरजांना प्रतिसाद देत आहेत.**



डॉ. विकास गुप्ता
matawealth
@timesofindia.com

कुटुंबाची पारंपरिक व्याख्या काळानुसार बदलत आहे. अनेक तरुण पालकत्व पुढे ढकलत आहेत, तर त्याच वेळी पाळीव प्राण्यांना कुटुंबातील सदस्य मानणाऱ्यांची संख्याही वाढत आहे. विशेषतः तरुण अविवाहित व्यक्ती पाळीव प्राण्यांच्या सहवासाचा आनंद घेत असून, त्यांच्या आरोग्याची आणि कल्याणाचीही काळजी घेत आहेत. या बदलत्या जीवनशैलीमुळे आधुनिक कुटुंबांच्या गरजांमध्येही परिवर्तन झाले आहे. कुटुंबातील इतर सदस्यांप्रमाणेच पाळीव प्राण्यांच्या आरोग्यासाठीही आर्थिक तरतूद करण्याकडे कल वाढत आहे.

## पाळीव प्राण्यांची वाढती संख्या

'वझीर ॲडव्हायजर्स २०२५ आउटलूक'नुसार, भारतातील पाळीव प्राण्यांची संख्या आर्थिक वर्ष २०२०मधील २.८५ कोटींवरून आर्थिक वर्ष २०२५मध्ये ३.९२ कोटींवर पोहोचली. आर्थिक वर्ष २०३०पर्यंत ही संख्या ६.०५ कोटींपर्यंत जाण्याचा अंदाज आहे. म्हणजेच, जवळपास नऊ टक्के वार्षिक वाढ अपेक्षित आहे. या आकडेवारीतून पाळीव प्राण्यांकडे पाहण्याच्या ग्राहकांच्या दृष्टिकोनातील बदल स्पष्ट होतो. अलीकडील सर्वेक्षणांनुसार, भारतातील ५६ टक्के पाळीव प्राणिमालक त्यांना कुटुंबातील सदस्य मानतात. या भावनिक नात्याचा परिणाम त्यांच्या आरोग्यविषयक आणि आर्थिक निर्णयांवरही होत आहे.

## आरोग्यसेवेवरील खर्चात वाढ

भारतातील पाळीव प्राण्यांचे पालक त्यांच्या संबंधित उत्पादनांवर आणि सेवांवर दर वर्षी सरासरी सुमारे ५० हजार रुपये खर्च करतात, असा अंदाज आहे. या खर्चातील मोठा हिस्सा आरोग्यसेवेशी संबंधित असतो. शस्त्रक्रिया, रुग्णालयात दाखल करणे, गंभीर आजारांवरील उपचार, पशुवैद्यकीय सल्ला, आपत्कालीन सेवा आणि विशेष वैद्यकीय प्रक्रिया यांचा खर्च अनेकदा हजारो किंवा लाखो रुपयांपर्यंत जाऊ शकतो. पशुवैद्यकीय उपचार अधिक प्रगत आणि खर्चिक होत असल्याने, पाळीव प्राण्यांच्या आरोग्याची तरतूदही कौटुंबिक आर्थिक नियोजनाचा भाग बनत आहे.

## एका पॉलिसीतच कुटुंब अन् प्राणी?

बदलत्या गरजांच्या पार्श्वभूमीवर, कुटुंबातील सदस्यांसोबत श्वान आणि मांजरींसाठीही संरक्षण देणाऱ्या आरोग्य विमा योजनांचा विचार वाढत आहे. अशा योजनांमुळे आधुनिक कुटुंबांच्या बदलत्या आरोग्यविषयक गरजा आणि जीवनशैलीशी विमा क्षेत्र जुळवून घेत असल्याचे दिसते. पॉलिसीच्या अटींनुसार, मानवी सदस्यांसाठी रुग्णालयातील उपचार, डे-केअर प्रक्रिया, आधुनिक उपचारपद्धती, रुग्णवाहिका सेवा, अतिदक्षता विभागातील उपचार आणि खोलीच्या भाड्याचा खर्च यांचा समावेश असू शकतो. काही योजनांमध्ये रोबोटिक शस्त्रक्रिया, इम्युनोथेरपी आणि तोंडावाटे दिली जाणारी केमोथेरपी यांसारख्या प्रगत उपचारपद्धतींसाठीही संरक्षण दिले जाऊ शकते. याशिवाय, डबल सम इन्शुअर्ड, गंभीर आजार आणि अपघातांसाठी मल्टिप्लायर, भारताबाहेरील नियोजित किंवा आपत्कालीन उपचारांसाठी ग्लोबल कव्हर, एअर ॲम्ब्युलन्स आणि हेल्थ लिमिटलेस यांसारखे पर्यायी लाभ काही पॉलिसींमध्ये उपलब्ध असू शकतात. मात्र, हे लाभ पॉलिसीनुसार बदलतात.

## पाळीव प्राण्यांसाठी खास लाभ

पेट-इन्क्लुझिव्ह विमा योजनांमध्ये पाळीव प्राण्यांच्या पालकांसाठी काही विशेष लाभ दिले जाऊ शकतात.

- **'बंडल ऑफ जॉय बेनिफिट'** : विमाधारक पाळीव प्राण्याने पिल्लांना जन्म दिल्यास, ठरावीक रकमेचा लाभ मिळू शकतो. त्यामुळे या प्रसंगी होणाऱ्या अतिरिक्त खर्चाचे व्यवस्थापन करणे सोपे होऊ शकते.
- **'इमर्जन्सी पेट ॲकोमोडेशन'** : पॉलिसीधारक रुग्णालयात दाखल झाल्यामुळे पाळीव प्राण्याची काळजी घेणे शक्य नसल्यास, त्याच्या बोर्डिंगचा खर्च या लाभांतर्गत भागवला जाऊ शकतो.
- **'एक्स्टेंडेड पेट स्टे'** : विशिष्ट परिस्थितींमुळे पाळीव प्राण्याला वेळेत घरी आणता न आल्यास, अतिरिक्त बोर्डिंग खर्चासाठी मदत मिळू शकते.
- **लॉंग-टर्म केअर कव्हर** : पाळीव श्वान किंवा मांजरीला दीर्घकाळ काळजीची आवश्यकता असलेल्या सूचिबद्ध आजाराचे निदान झाल्यास, एकरकमी लाभ मिळण्याची तरतूद असू शकते.
- **'थर्ड-पार्टी' दायित्वापासून संरक्षण** : पाळीव प्राण्यामुळे इतर व्यक्तीला अपघाती दुखापत झाली, मृत्यू झाला किंवा मालमत्तेचे नुकसान झाले, तर कायदेशीर दायित्व निर्माण होऊ शकते. 'पेट थर्ड-पार्टी लायबिलिटी' अशा परिस्थितीत पाळीव प्राण्याच्या पालकांना आर्थिक संरक्षण देण्यास मदत करू शकते. काही योजनांमध्ये पाळीव प्राण्याचा आजार, अपघात किंवा दीर्घकाळ सुरू असलेल्या त्रासामुळे मृत्यू झाल्यास; तसेच निर्धारित परिस्थितीत तो कायमचा हरवला किंवा चोरीला गेल्यास पर्यायी पाळीव प्राण्याचा समावेश करण्याची सुविधा असू शकते.
- **'पॉ प्रॉमिस'सारखे भावनिक संरक्षण** : संरक्षित केलेल्या परिस्थितीत पाळीव प्राण्याचा मृत्यू झाल्यानंतर नवीन पाळीव प्राणी स्वीकारण्यासाठी आर्थिक मदत देणारा 'पॉ प्रॉमिस बेनिफिट' काही योजनांमध्ये उपलब्ध असू शकतो.

## पॉलिसी घेताना काय तपासाल?

- कोणत्या प्राण्यांना आणि जातींना संरक्षण मिळते?
- आजार, अपघातांसाठी प्रतीक्षा कालावधी किती?
- जुने आजार वगळले आहेत का?
- नियमित आरोग्य तपासणीची अट आहे का?
- बोर्डिंग, चोरी, हरवणे आणि थर्ड-पार्टी दायित्वासाठी किती मर्यादा आहे?
- दावा दाखल करण्याची प्रक्रिया आणि आवश्यक कागदपत्रे कोणती?
- 'को-पे', सबलिमिट आणि वगळलेल्या बाबी कोणत्या आहेत?

पाळीव प्राण्यांना कुटुंबातील सदस्य मानणाऱ्या पालकांसाठी त्यांचा आरोग्य विमा हा केवळ आणखी एक विमा लाभ नाही. तो आधुनिक कौटुंबिक जीवनातील बदलत्या नात्यांची दखल घेणारा आर्थिक पर्याय आहे. पाळीव प्राण्यांच्या आरोग्यसेवेबाबत जागरूकता वाढत असताना, कुटुंबाच्या आरोग्य नियोजनात त्यांचाही समावेश करणे ही आता केवळ नवी संकल्पना नाही. आपल्या देखभालीवर अवलंबून असलेल्या प्रत्येक सदस्याच्या आरोग्याची आर्थिक जबाबदारी स्वीकारण्याच्या कुटुंबांच्या बदलत्या दृष्टिकोनातील ते पुढचे पाऊल आहे.

**(लेखक 'बजाज जनरल इन्श्युरन्स'च्या 'हेल्थ ॲडमिनिस्ट्रेशन टीम'चे प्रमुख आहेत.)**